Sakal 27.02.2018
Page No. 04

# ‘फिनोलेक्स’मधील श्रुती करकरे सर्वोत्तम

## फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन : मूक-बधिर विद्यालयाला मदत

सकाळ वृत्तसेवा




रत्नागिरी : फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनात बोलताना पद्मश्री लीला पूनावाला. शेजारी समीर दुआ, बी. बी. आहुजा, अरुणा कटारा, आणि डॉ. कौशल प्रसाद.

रत्नागिरी, ता. २६ : अधिकाधिक यशस्वी होण्यासाठी आवश्यक ध्येयवादाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज असल्याचे मत पद्मश्री लीला पूनावाला यांनी व्यक्त केले.

फिनोलेक्स ॲकॅडमीमध्ये वार्षिक स्नेहसंमेलनात प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. या वेळी समीर दुआ, बी. बी. आहुजा, होप फौंडेशनच्या अध्यक्षा अरुणा कटारा, प्राचार्य डॉ. कौशल प्रसाद, विद्यार्थी प्रतिनिधी नील सुखटणकर व मीनल पाटील, ब्रेनवेव्हचे विद्यार्थी प्रतिनिधी शुभम विचारे उपस्थित होते.

दि न्यू एज्युकेशन सोसायटीच्या के. प. अभ्यंकर मूक-बधिर विद्यालयास सामाजिक जाणिवेतून मदत करण्यात आली. चेअरमन प्राईझ अभिषेक भाटकर, स्व. श्रीमती मोहिनी छाब्रिया ॲवॉर्ड रूपेश वाळके, स्नेहल सावंत, रजत प्रभू, रविना पाटिल, बाबाजी सावंत, सानीया मुर्तुझा व नीहा दसुरकर यांना प्रदान करण्यात आला. सनी सांभेकर, स्वरुपा बागडे, हर्षदा गावडे या विद्यार्थ्यांना होप फाऊंडेशन शिष्यवृत्ती देऊन गौरवण्यात आले. श्रीमती अरुणा कटारा यांच्या वतीने सर्वोत्तम क्रीडापटू जयदीप प्रभू व श्रुती करकरे यांना गौरवण्यात आले. सर्वोत्तम विद्यार्थ्याचे पारितोषिक श्रुती करकरेने पटकाविले. विद्यार्थ्यांनी तयार केलेली रेसिंग व्हेइकल्सची सर्व मान्यवरांनी पाहणी करून कौतुक केले. ब्रेनवेव्हज्अंतर्गत कलाकृती या कलादालनात विद्यार्थ्यांनी अतिशय कुशलतेने घडवलेल्या पॉट पेंटिंग, रांगोळी, चित्रकृती, फोटो गॅलरी आदी उपक्रमाबद्दल मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. डॉ. शारदा चौगुले यांनी इलेक्ट्रॉनिक्स अॅन्ड टेलिकम्युनिकेशन शाखेत शिवाजी विद्यापीठातून पीएचडी प्राप्त केली. त्यांचा गौरव करण्यात आले. एनपीटीएल परीक्षेत विशेष यश प्राप्त केल्याबद्दल प्रा. सुजय माईणकर व प्रा. दत्तात्रय डेंगळे, संस्थेमधील विशेष सेवेबद्दल दीपक मेस्त्री व अविनाश लिंगायत यांना गौरविण्यात आले.